


UNITE FOR GOOD

# अजिंठा

एप्रिल - २०२६ ● अंक- १० वा



आर.आय.प्रेसिडेंट
रो.फ्रान्सिस्को अरेइझो



डिस्ट्रीक्ट गव्हर्नर
रो.ज्ञानेश्वर शेवाळे



प्रेसीडेंट
रो.गिरीश कुलकर्णी



ऑन.सेक्रेटरी
रो.सुभाष अमळनेरकर



बुले.कमिटी चेअरमन
रो.कॅ.मोहन कुलकर्णी

Rotary | UNITE FOR GOOD

**ROTARY CLUB JALGAON**

R. I. Dist. 3030 | Club No. 15512 | RIY : 2025-26
Estd. 6th February 1950

## संपादकीय...

नमस्कार, रोटरी प्रणाम, जय हिंद...

एप्रिल महिन्याचा 'अजिंठा' आपणास सादर करतांना खूप आनंद होत आहे. हा या वर्षाचा १० वा अंक आहे. एप्रिल हा 'पर्यावरण' या विषयासाठी 'डेसिग्नेटेड मंथ' आहे. त्याबद्दल खूप चांगला लेख आपणास रो.कौस्तुभ गोखले, बडोदा यांच्याकडून प्राप्त झाला आहे. रोटरी इंटरनॅशनल वर्षभरातील विविध महिन्यांमध्ये विशिष्ट विषयांवर लक्ष केंद्रीत करून सेवा कार्य करीत असते, यालाच आपण डेसिग्नेटेड मंथ्स् म्हणतो. या महिन्यांचे उद्दिष्ट रोटरी क्लबच्या सदस्यांना विशिष्ट समाज सेवा प्रकल्पांवर लक्ष केंद्रीत करण्यास मदत करणे हे असते. मार्च मध्ये आपण 'Water Sanitation' हा विषय असल्याने 'गड–किल्ले–दुर्गांवरील जलसंस्कार' या विषयावर प्रसिद्ध दुर्ग अभ्यासक श्री.देवदत्त गोखले यांचे अभ्यासपूर्ण भाषण आयोजित केले होते. मार्चमध्ये होळी हा पवित्र सण आपण साजरा केला आणि ८ मार्चला जागतिक महिला दिना निमित्त जळगाव शहराच्या प्रथम नागरिक महापौर सौ.दीपमाला काळे आणि त्यांच्याबरोबर इतर महिलांचा आपण आपल्या क्लब मध्ये सत्कार केला. घेतलेल्या इतर अनेक महत्त्वाच्या प्रकल्पांची आणि साप्ताहिक सभांची माहिती तसेच उगवते तारे, बुक रिव्हयु, बॉलीवूड टाईम्स् इ. सदर याही अंकात आपणास वाचायला मिळतील. रोटरी क्लब ही संस्था समाज व राष्ट्राला एक सूत्रात गुंफून स्वास्थ्य, शिक्षण, वृक्षारोपण, पर्यावरण संरक्षण, समाज सेवा यांचे व्रत घेऊन महत्त्वपूर्ण कार्य करीत आहे. यावर्षी आपण आतापर्यंत अनेक क्लबचे इंडक्शन करून रोटरीचा प्रसार केला आहे. लोकं आता रोटरी कडे जास्त आकृष्ट व्हायला लागली आहेत. याचाच अर्थ रोटरी आता जास्त चांगले, परिणामाकारक समाजकार्य करीत आहे. 'जस जसे तुमचे वय वाढत जाईल, तस तसे तुमच्या लक्षात येईल की तुम्हांला दोन हात आहेत'– एक स्वत:च्या मदतीसाठी, तर दुसरा इतरांच्या मदतीसाठी' हे सुप्रसिद्ध अभिनेत्री ऑड्रे हेपबर्न यांचे वाक्य आपल्या रोटेरिअन्स ना अगदी चपखल बसते. तसेच 'एकटे असतांना आपण फारच कमी करू शकतो, एकत्र मिळून आपण खूप काही करू शकतो' हे हेलन केलर यांनी म्हटल्याप्रमाणे 'Unite for Good' या आपल्या रोटरी इंटरनॅशनलच्या अध्यक्षांच्या संदेशाप्रमाणे आपण कार्य करीत असतो आणि पुढेही तसेच ते करीत राहू. धन्यवाद!

**– रो.कॅप्टन मोहन कुलकर्णी**

## अध्यक्षीय मनोगत...

प्रिय रोटरी मित्रांनो, रोटरी प्रणाम !

मार्च महिना आपल्या क्लबसाठी उपक्रमांनी समृद्ध आणि समाधान देणारा ठरला. आदिवासी भगिनींसाठी मोहफुलांपासून पौष्टिक पदार्थ निर्मिती कार्यशाळा, ७x७x७ प्रकल्पाचा समारोप, तसेच Best Interact Club Award ही आपल्या कार्याची सातत्य व समर्पणाची पावले ठरली. महिला अधिकारांवर RCC ऑफ राईपतर्फे व्याख्यान, आनंदघरला लॅपटॉप प्रदान, तसेच आनंदघराच्या ३० विद्यार्थ्यांना व वैजापूर येथील ७५ आदिवासी बालकांना हायजीन किट वाटप या उपक्रमांमधून आपल्या सामाजिक बांधिलकीची जाणीव अधिक दृढ झाली. 'संकल्प' पुस्तक वितरण, रोटरी वाचन कट्टा आणि Peace Course प्रस्ताव विद्यापीठात सादर करणे हे आपल्या बौद्धिक व दीर्घकालीन प्रकल्पांच्या दिशेने टाकलेले महत्त्वाचे पाऊल आहे.

एप्रिल महिन्यात आपण पर्यावरणपूरक उपक्रमांना विशेष प्राधान्य देत आहोत. सदस्यांसाठी माफक दरात घरटे व परळ उपलब्ध करून देणे हा एक अभिनव प्रयत्न असेल. सातपुड्यातील आदिवासी पाड्यांमध्ये किमान २५ घरांसाठी सोलर लायटिंग सुविधा उभारण्याचा मानस आहे. Peace Course ला मान्यता मिळाल्यास याच महिन्यात शुभारंभ करण्यात येईल. ज्ञानवृद्धीसाठी ऑनलाईन सामान्यज्ञान प्रश्नमंजुषा, युवकांसाठी Reel स्पर्धा, तसेच वाचनसंस्कृतीला चालना देणारी Book Review स्पर्धा आयोजित करण्यात येणार आहे. साप्ताहिक सभांमध्येही फसव्या जाहिरातींसारख्या नाविन्यपूर्ण विषयांवर चर्चा घडवून आणली जाईल.

रोटरी वर्षातील मोठा टप्पा आपण पार केला असला तरी खरी कसोटी उर्वरित काळात आहे. शेवटच्या दिवसापर्यंत सातत्याने, नियोजनबद्ध आणि परिणामकारक सेवा कार्य करणे हीच आपली ओळख व संस्कृती आहे. यासाठी साप्ताहिक सभांमधील उपस्थिती आणि सेवा प्रकल्पांमधील सक्रिय सहभाग अत्यावश्यक आहे.

चला, उर्वरित काळातही नव्या उर्जेने, नव्या संकल्पाने एकत्र येऊया आणि 'Unite For Good' या ध्येयाने समाजात सकारात्मक परिवर्तन घडवू या !

**– रो.गिरीश कुलकर्णी**

# साप्ताहिक सभा

# मार्च महिन्यातील साप्ताहिक सभा

*** दि.६ मार्च –** या साप्ताहिक सभेत महिला दिनाच्या निमित्ताने अनेक महिलांचा सत्कार करण्यात आला. प्रमुख पाहुण्या म्हणून महापौर सौ.दीपमाला काळे यांना सन्मानपत्र देऊन गौरवण्यात आले. सहाय्यक प्रांतपाल रो.डॉ.अपर्णा भट यांना रोटरी शक्ती, पी.पी.रो.पुनम मानुधने यांना सर्व्हीस एक्सलन्स, रो.डॉ.शुभदा कुलकर्णी यांना आऊटस्टॅंडींग लिडर व रो.स्वाती ढाके यांना मोस्ट प्रॉमिसिंग रोटेरीयन हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी महिला सदस्यांसाठी विशेष खेळ घेण्यात आले. ही सभा महिला समितीने आयोजित केली होती. सूत्र संचालन फर्स्ट लेडी रो.ॲन.अदिती कुलकर्णी यांनी केले.







*** दि. १३ मार्च–** या सभेत छत्रपती शिवाजी महाराजांनी त्यांच्या गड–किल्ले, दुर्गांवरील जलसंस्कार, ती पद्धत किती विचारपूर्वक होती आणि आजही ते आपल्यास मार्गदर्शक आहेत असे प्रतिपादन या सभेसाठी लाभलेले प्रमुक वक्ते गड–किल्ले अभ्यासक श्री.देवदत्त गोखले यांनी केले. मार्च महिना हा वॉटर सॅनिटेशन ॲन्ड हायजिन या विषयावर आधारित असल्याने हे विशेष व्याख्यान आयोजित केले होते. यावेळी अध्यक्ष रो.गिरीश कुलकर्णी यांनी प्रमुख वक्त्यांचा सन्मानचिन्ह देऊन सत्कार केला. रो.जयवर्धन नेवे यांनी आभार प्रदर्शन केले.

*** दि.२० मार्च –** आपल्या क्लबचे सदस्य रो.जयवर्धन नेवे यांनी त्यांच्या शिवरत्न प्रतिष्ठान तर्फे शिवाजी महाराजांच्या जीवनावर वस्तूनिष्ठ असलेले ‘राजा रयतेचा’ या महानाट्याची निमिर्ती करून पालघरला कोकण महोत्सवात त्याचे सतत ४ दिवस सादरीकरण केले. त्याबद्दल या साप्ताहिक सभे मध्ये त्यांची मुलाखत घेण्यात आली. या महानाट्यात आदरणीय जीजाऊंची भूमिका साकार करणाऱ्या रो.स्वाती ढाके यांची सुद्धा यावेळी मुलाखत घेण्यात आली. या महानाट्यात एकूण १५३ कलावंतांनी भाग घेतला होता. यावेळी या महानाट्याचे निर्माते रो.जयवर्धन नेवे, रो.स्वाती ढाके व इतर स्थानिक कलावंत यांचा सत्कार केला. या महानाट्या द्वारे शिवाजी महाराजांचे नेतृत्व, कर्तुत्व व दातृत्व लोकांपर्यंत पोहोचविण्याचा आमचा प्रयत्न आहे असे रो.जयवर्धन नेवे म्हणाले.



# साप्ताहिक सभा




*** दि.२७ मार्च –** या सभेत ज्येष्ठ सामाजिक, कार्यकर्ते व आरोग्य तज्ञ डॉ.सतीश गोकुलवार यांचे जाहीर व्याख्यान रोटरी क्लब जळगाव आणि गांधी रिसर्च फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने रोटरी हॉल येथेच 'आम्ही आमच्या आरोग्यासाठी' या विषयावर आयोजित करण्यात आले होते. डॉ.गोकुलवार हे सर्वोदयातील कार्यकर्ते असून त्यांच्यावर महात्मा गांधी व जयप्रकाश नारायण यांच्या विचारांचा प्रभाव आहे. एमबीबीएस चे शिक्षण झाल्यावर ते गडचिरोली येथील आदिवासी बांधवांसाठी त्यांच्याच सहकार्याने आरोग्य, जल, जंगल व जमीन या विषयांवर मागील चार दशकांपासून कार्य करीत आहेत. त्यांना सन २०२४ च्या इंटरनॅशनल ह्युमॅनिटेरिअन ॲवार्डने सन्मानित करण्यात आले आहे. गांधी रिसर्च फाऊंडेशन चे विश्वस्त डॉ.सुदर्शन अय्यंगर यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांनीही यावेळी मौलिक मार्गदर्शन केले. ही पब्लीक मिटींग असल्याने शहरातील अनेक मान्यवर या व्याख्यानास उपस्थित होते.

# प्रोजेक्ट

## मार्च महिन्यातील प्रोजेक्ट




*** दि.१३ मार्च –** रोटरी क्लब जळगाव पुरस्कृत रोटरी कम्युनिटी कोअर (आरसीसी) ऑफ राईप तर्फे 'महिला अधिकार' या विषयावर गणपती नगर येथील रोटरी सभागृहात सुप्रसिद्ध सामाजिक कार्यकर्त्या व कॉर्पोरेट क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या श्रद्धा रेखा राजेंद्र यांचे महिलांसाठी व्याख्यान आयोजित केले होते. रो.ॲन.ॲड.रूपाली भोकरीकर यांनी सुद्धा यावेळी या विषयावर मौलिक मार्गदर्शन केले. प्रास्तविक पल्लवी जोशी यांनी केले. योगिता पाटील यांनी महिलांप्रति आदर व्यक्त करणारी माहिती दिली. यावेळी व्यासपीठावर क्लबचे मा.सचिव रो.सुभाष अमळनेरकर, फर्स्ट लेडी आदिती कुलकर्णी, रो.डॉ.शुभदा कुलकर्णी उपस्थित होते. आर.सी.सी.चे अनेक सदस्य उपस्थित होते.

*** दि. १७ मार्च–** रोटरी क्लब जळगाव तर्फे समाजोपयोगी उपक्रमांतर्गत वर्धिष्णु या स्वयंसेवी संस्थेला कार्यालयीन कामकाज सुलभ व्हावे म्हणून लॅपटॉप भेट देण्यात आला. यावेळी तंट्या भिल वस्तीतील आनंद घरातील गरीब मुलांना टूथ ब्रश, टूथ पेस्ट व पौष्टिक आहार म्हणून राजगिरा लाडू व चिक्कीचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमात संस्थेच्या संचालिका प्रणाली सिसोदीया यांनी वधिष्णु संस्थेचे कार्याबद्दल थोडी माहिती दिली. यावेळी अध्यक्ष रो.गिरीश कुलकर्णी यांनी येथील मुलांशी संवाद साधत शिक्षण, शिस्त व स्वच्छतेचे महत्त्व पटवून दिले. याप्रसंगी संवाद सचिव रो.पंकज व्यवहारे, रो.कॅप्टन मोहन कुलकर्णी, रो.डॉ.शुभदा कुलकर्णी, रो.चंदन महाजन, रो.योगेश गांधी, रो.सुबोध सराफ, रो.संदीप शर्मा इ.सदस्य उपस्थित होते.





## प्रोजेक्ट

# मार्च महिन्यातील प्रोजेक्ट


**✻ दि.२६ मार्च –** रोटरी क्लब जळगाव व गांधी रिसर्च फाऊंडेशन तर्फे आदिवासी महिलांसाठी मोहाच्या झाडांच्या फुलांपासून अनेक पौष्टिक पदार्थ बनवण्याबद्दलची कार्यशाळा वैजापूर, ता.चोपडा येथे आयोजित करण्यात आली. यात मोहफुलांचा चिवडा, लाडू व केक बनविण्याचे प्रशिक्षण दिले. या कार्यशाळेमुळे महिला सबलीकरणा बरोबरच उपजिविकेच्या अनेक संधी उपलब्ध होतील अशी अपेक्षा आदिवासी विकास विभाग यावलचे सहाय्यक प्रकल्प अधिकारी श्री.संदीप पाटील यांनी व्यक्त केला. या कार्यशाळेत ३८ भगिनींनी सहभाग घेतला. याप्रसंगी सरपंच व इतर मान्यवरां बरोबर अध्यक्ष रे.गिरीश कुलकर्णी व रो.सुभाष अमळनेरकर, रो.संदीप शर्मा उपस्थित होते.





**✻ दि. २६ मार्च–** वैजापूर येथील ७५ आदिवासी विद्यार्थ्यांना रोटरी क्लब जळगाव तर्फे हायजीन किटचे (टुथ ब्रश, टूथ पेस्ट, पौष्टीक लाडू) वाटप करण्यात आले. त्यांना स्वच्छता व शिस्त याबद्दलची माहिती देण्यात आली. याप्रसंगी अध्यक्ष रो.गिरीश कुलकर्णी, मानद सचिव रो.सुभाष अमळनेरकर, संवाद सचिव रो.पंकज व्यवहारे, विद्याताई, सरपंच दत्तरसिंग, वनरक्षक विजय शिरसाट, डॉ.गोकुलवार उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रशांत सुर्यवंशी यांनी केले तर आभार प्रदर्शन रो.सुभाष अमळनेकर यांनी केले.

**✻ दि. ८ व २९ मार्च–** हा एक वाचन संस्कृती वाढवण्यासाठी प्रयत्न करणारा या वर्षी सातत्याने राबवण्यात येणारा प्रकल्प आहे. यावेळी ८ तारखेचा वाचन कट्टा रोटरी हॉल मध्ये संपन्न झाला तर २९ तारखेचा वाचन कट्टा हा ऑनलाईन घेण्यात आला. हा एक नवीन प्रयोग करण्यात आला आणि त्यास चांगला प्रतिसाद मिळाल्याने यशस्वी झाला. 'मला आवडलेले पुस्तक' या विषयावर सदस्यांनी आपल्याला आवडलेल्या पुस्तकातील निवडक उतारे वाचून दाखवले. यावेळी अध्यक्ष रो.गिरीश कुलकर्णी, संवाद सचिव, पंकज व्यवहारे, माजी अध्यक्ष रो.प्रेम कोगटा आणि इतर असे अनेक सदस्य उपस्थित होते.




## इंटररॅक्ट क्लब पुरस्कार वितरण व ७X७X७ प्रकल्प समारोप समारंभ–क्षणचित्रे.....






प्रोजेक्ट

# इंटररॅक्ट क्लब पुरस्कार वितरण व ७x७x७ प्रकल्पाचा समारोप समारंभ

* रविवार दि.२२/३/२०२६– रोजी सकाळी १० वाजता रोटरी सभागृहाचे वातावरण अगदी आगळे वेगळे आनंदी आणि fully charged असे झाले होते. इंटरॅक्ट क्लबचा पुरस्कार वितरण आणि ७x७x७ या प्रकल्पाचा समारोप समारंभ असे दोन प्रमुख सोहळे आयोजित करण्यात आले होते. शालेय विद्यार्थ्यांच्या उपस्थितीने आमचे नेहमीचे औपचारिक वाटणारे सभागृह या सुंदर गलाबलाटाने फार छान वाटत होते. आजच्या या समारंभास रोटरी डिस्ट्रीक्ट गव्हर्नर इलेक्ट डॉ.राजेश पाटील, अनुभूती शाळेच्या संचालिका सौ.निशाभाभी जैन, सहाय्यक प्रांतपाल डॉ.सौ.अपर्णा भट, अध्यक्ष रो.गिरीश कुलकर्णी, संवाद सचिव रो.पंकज व्यवहारे, इंटरॅक्ट कमिटी चेअर रो.डॉ.सौ.काजल फिरके आणि ७x७x७ प्रकल्प प्रमुख रो.सुबोध सराफ व्यासपीठावर उपस्थित होते.

यावेळी 'जीना इसीका नाम है' या विषयावर प्रमुख अतिथी डॉ.राजेश पाटील बोलतांना इंटरॅक्ट सदस्य होणे म्हणजे सकारात्मक जीवनाकडे तुमचे पहिले पाऊल आहे. अपयशाने खचून न जाता, त्यातून शिकून आपली प्रगती करीत यशस्वी व्हावे. असा सल्ला विद्यार्थ्यांना दिला. यावेळी सौ.निशाभाभी जैन यांनीही मनोगत व्यक्त केले. त्यांनी ७x७x७ या प्रकल्पाचे खूप कौतुक केले आणि शहरातील अनेक शाळांमध्ये हा प्रकल्प राबविला जावा असेही सांगितले.

कार्यक्रमात इंटरॅक्ट क्लब ऑफ जिजामाता माध्यमिक विद्यालयास 'इंटरॅक्ट क्लब ऑफ द इयर' ॲवार्डने सन्मानित करण्यात आले. 'ज्ञान संकल्प एक्सलन्स ' ॲवार्डने इंटरॅक्ट कलब ऑफ नंदिनीबाई वामनराव मुलींचे विद्यालयास तर 'मोस्ट व्हायब्रंट इंटरॅक्ट क्लब' हा ॲवॉर्ड का.ऊ.कोल्हे या विद्यालयास देण्यात आला. बेस्ट पार्टीसिपेटिव्ह इंटरॅक्ट क्लब– हा ॲवार्ड श्रीराम हायस्कूल, 'आऊटस्टॅंडींग कम्युनिटी सर्व्हीस ॲवार्ड' धानोरा येथील झेड.टी.महाजन विद्यालयास प्रदान करण्यात आला. 'डिकेड ऑफ डेडिकेशन ॲवार्ड' या. दे. पाटील विद्यालयास ७x७x७ प्रोजेक्टसाठी देण्यात आले. या. दे. पाटील विद्यालयाच्या शिक्षिका सौ.वर्षा अहिरराव यांच्या तीन हस्तलिखितांचे प्रकाशन यावेळी मान्यवरांचे हस्ते करण्यात आले. 'जल है तो कल है' हे पथनाट्य या. दे. पाटील विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सादर केले. रोटरीच्या डेसिग्नेटेड मंथच्या विषयाला अनुसरून सदर पथनाट्य सादर केल्याने त्याचे विशेष कौतुक झाले. यावर्षी नव्याने स्थापन झालेल्या पाच इंटरॅक्ट क्लबना मान्यवरांच्या हस्ते चार्टर देण्यात आला.

७x७x७ च्या समारोप समारंभात सौ.निशाभाभी म्हणाल्या की, रोटरी क्लबच्या सदस्यांनी आपल्या अनुभवाच्या, ज्ञानाचा फायदा शालेय विद्यार्थ्यांना या प्रकल्पाच्या माध्यमातून निरंतन करून दिला आहे हे खूप महान कार्य आहे. डॉ.राजेश पाटील यांनी या सारखे उपक्रम संपूर्ण डिस्ट्रीक्ट मध्ये राबविण्याचा मानस व्यक्त केला. या कार्यक्रमात ७x७x७ प्रकल्पातील वक्ते रो.गिरीश कुलकर्णी, रो.पंकज व्यवहारे, रो.डॉ.शुभदा कुलकर्णी, रो.डॉ.शमा सराफ, रो.स्वाती ढाके, रो.कंवरलाल संघवी, रो.ॲड.सागर चित्रे, रो.ॲड.महेश भोकरीकर, रो.ॲड.आनंद मुजुमदार, रो.डॉ.पराग जहागीरदार, रो.डॉ.पवन बजाज, रो.डॉ.रवि हिराणी, रो.डॉ.सतीश शिंदाडकर, रो.राजेश वेद आणि कमिटी चेअरमन रो.सुबोध सराफ यांच्यासह शाळेतील सर्व मुख्याध्यापक व को–ऑर्डीनेटर यांचा सत्कार करण्यात आला. व्याख्यान शाळेतील वक्त्यांच्या वतीने रो.डॉ.पराग जहागीरदार, रो.राजेश वेद यांनी तर शाळेतील वक्त्यांच्या वतीने रो.डॉ.पराग जहागीरदार, रो.राजेश वेद यांनी तर शाळेतर्फे सरोज तिवारी मॅडम व संजय खैरनार सरांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन रो.सुबोध सराफ व रो.ॲन.अदिती कुलकर्णी यांनी केले.





रोटरी मंथ निमित्ताने

## डेसीग्नेटेड मंथ-

# Environment: From Awareness to Action The Role of Rotary Clubs

**Rtn. Kaustubh Gokhale**



In recent years, environmental awareness has grown significantly across the globe. From climate change discussions to campaigns on water conservation and waste management, people are more informed than ever before. However, awareness alone is not enough. The real challenge lies in transforming this awareness into meaningful action. This is where organizations like Rotary International and its network of local Rotary Clubs play a crucial role.

Rotary Clubs, known for their commitment to service above self, have increasingly embraced environmental sustainability as a core focus area. With their strong community presence and structured approach, they are uniquely positioned to bridge the gap between knowledge and action. They do not just talk about environmental issues they actively implement solutions at the grassroots level.

One of the key strengths of Rotary Clubs is their ability to mobilize communities. Awareness campaigns conducted by Rotary members help educate citizens about pressing issues such as water scarcity, pollution, deforestation, and climate change. These campaigns often include seminars, workshops, school programs, and social media outreach, ensuring that environmental consciousness reaches all age groups.

However, what sets Rotary apart is its emphasis on action-oriented initiatives. Many clubs undertake tree plantation drives, lake and river cleaning projects, rainwater harvesting systems, and plastic-free campaigns. These activities not only improve the local environment but also inspire citizens to adopt sustainable practices in their daily lives. For example, a single Rotary-led clean-up drive can motivate an entire neighbourhood to take responsibility for waste management.

Another significant contribution of Rotary Clubs is their collaboration with local authorities, NGOs, and corporates. By forming partnerships, they amplify their impact and ensure long-term sustainability of projects. Whether it is installing water conservation systems in rural areas or promoting renewable energy solutions, Rotary Clubs act as catalysts for change by bringing together resources, expertise, and community participation.

Youth engagement is another area where Rotary Clubs excel. Through programs like Rotaract and Interact, young individuals are encouraged to take leadership roles in environmental initiatives. This not only nurtures responsible future citizens but also ensures continuity in environmental efforts. When young minds are involved, innovative ideas and fresh energy further strengthen these initiatives.

Importantly, Rotary Clubs lead by example. Their members often adopt eco-friendly practices such as reducing plastic use, conserving water, and supporting sustainable products. This personal commitment reinforces their message and builds credibility within the community.

In conclusion, while environmental awareness is the first step, it is collective action that drives real change. Rotary Clubs play a vital role in transforming awareness into tangible impact. By combining education, community engagement, and practical initiatives, they demonstrate that sustainable change is possible when individuals come together with a shared purpose. The journey from awareness to action is not easy, but with organizations like Rotary leading the way, it becomes achievable and impactful.

(Rtn. Kaustubh Gokhale is an expert on Water Management and a well known personality in Bardoa. He is presently Treasurer and President Elect of Rotary Club of Baroda Greens, Dist. 3060)

## उगवते तारे

# ‘वेगळ्या वाटेने जातांना....’

रो.ॲन.सौ.ममता निलेश झोपे



आम्हांला दोन मुली आहेत. मोठीचे नाव रेवा आणि धाकटीचे नेहल. रेवाला लहानपणापासूनच चित्रकलेची आवड होती. तिने Elementary आणि Intermediate या परीक्षांमध्ये खूप चांगले गुण मिळवले होते. तिच्यात चांगली Creativity सुद्धा आहे. त्यामुळे तिने डिझाईन हे क्षेत्र निवडले. बी–डिझाईन च्या प्रवेश परीक्षेसाठी तिने खूप मेहनत घेतली. याबाबत तिने जळगावातील सुप्रसिद्ध चित्रकार तरूण भाटे यांचे मार्गदर्शन घेतले. अहमदाबाद येथे एक महिन्याचा Crash Course ही तिने केला. आजचा काळ माहितीचा काळ आहे. नवनवीन माहितीच्या आधारे, विस्तृत चहुबाजूने विश्लेषण करणे या सगळ्या गोष्टींचा विचार करून बी–डिझाईन करायचा निर्णय घेतला. हा चार वर्षाचा कोर्स आहे. डॉक्टर, इंजिनिअर या जुन्या प्रचलित कोर्सेस पेक्षा हा कोर्स खूप वेगळा आहे. यात १२ पेक्षा जास्त विविध शाखा आहेत. उदा.इंटेरिअर डिझाईन, फॅशन डिझाईन, प्रॉडक्ट डिझाईन, व्हिज्युअल कम्युनिकेशन डिझाईन इत्यादी. रेवाने व्हिज्युअल कम्युनिकेशन डिझाईन ही शाखा निवडली. यामध्ये आपण आपल्या डोळ्यांनी जे बघतो. उदा. व्हॉटसअप किंवा फेसबुक इ. मोबाईलवर किंवा होर्डींगवर एका ब्रॅन्डची जाहिरात, सिनेमात काश्मीर मध्ये न जाता तिथला बर्फ, हिरवळ, निसर्ग दिसतो. किंवा काल्पनिक डायनासोर सारखे पात्र तयार करणे इ. गोष्टींचा समावेश आहे. साध्या ब्रॅन्डचा लोगो तयार करणे पासून ॲप डिझाईन पर्यंतचे करिअर या प्रशिक्षणातून मिळते.

मोबाईलमध्ये भरपूर ॲप असतात पण आपले बोट एका विशिष्ट ॲप वरच वारंवार का जाते? त्याची रंगसंगती, आणि सोपं इंटरफेस आपणास आकर्षित करतात म्हणनू हे सगळे या चार वर्षाच्या कोर्समध्ये शिकवले जाते. ही संस्था जगप्रसिद्ध Tata Institute of Social Science ला संलग्न असलेल्या Whistling Woods या संस्थेत आहे. Whistling Woods हे गोरेगाव (मुंबई) फिल्मसिटी मध्ये असून सुप्रसिद्ध सिने निर्माते व दिग्दर्शक सुभाष घई हे त्यांचे संस्थापक चेअरमन आहेत.

आजच्या काळात मार्केटींग आणि ब्रॅंडींगमध्ये एखादी कल्पना किंवा संदेश दृष्य स्वरूपात मांडतांना शब्दांपेक्षा व्हिज्युअल एलिमेंट द्वारे जास्त प्रभावीपणे मांडता येते. आणि ते दीर्घकाळ लक्षातही राहते. यात मोशन डिझाईन, इंटरॅक्शन डिझाईन (Digital/U.I.) व Environmental Design सदर ज्ञानाचा उपयोग करून खालील क्षेत्रात करिअर घडवण्याची संधी मिळते. (1) UI/UX Design, (2) Motion Design, (3) Brand Design, (4) Art Director. थोडक्यात या Creative Industry मध्ये चांगली संधी आहे. रेवा ते चांगल्या रीतीने करीत आहे, याचा आम्हांला अभिमान आहे.

माझी धाकटी मुलगी नेहल सध्या ११ वी कॉमर्स शिकत आहे. ती पण खूप हुशार आहे. तिचे ध्येय चांगल्या कॉलेज मधून BBA करणे हे आहे.

वडील रो.निलेश झोपे हे नेहमीच या दोघींना मार्गदर्शन करीत असतात. प्रोत्साहन देत असतात. आम्ही पालक म्हणून त्यांच्या पाठीशी असतोच पण निर्णय स्वातंत्र्य त्यांना दिले आहे. आपल्या रोटरी क्लबच्या वातावरणामुळेही त्यांचे व्यक्तीमत्त्व सुधारण्यास खूप मदत होते. मला ‘उगवते तारे’ या सदरात लेख लिहिण्याची संधी दिल्याबद्दल मी रोटरीची आभारी आहे.

## बॉलीवुड टाईम्स

### 'मेरे अपने...'

रो.सुबोध सराफ



''गुलजार' दिग्दर्शित पहिला सिनेमा.....ही सुरवातीची 'तरलता' पुढे कायम टिकली.....बंगाली दिग्दर्शक 'तपन सिन्हा' यांचा 'अपनाजन 'चा हा हिन्दी रिमेक होता....हिंदी पटकथा गुलजार यांची होती...' Legendary actress मीना कुमारीचा ' अखेरचा चित्रपट.....विनोद खन्ना... शत्रुघ्न सिन्हा.... योगिता बाली...पेंटल... असरानी.... दिनेश ठाकूर....व इंट्रोड्युसिंग 'डॅनी डेंगजोप्पा '.... दोन गँग्ज मधील खुन्नस .. बेरोजगारी.... भेदक वास्तववादी चित्रण ...हे या सिनेमाचे वैशिष्ट्य ... यातील एक गाणे जे आजही देशाच्या एकूण परिस्थितीस चपखल बसावे असेच आहे....'हालचाल ठीक ठाक है ..सब कुछ ठीक ठाक है ..बी. ए. किया है एम . ए . किया लगता है वो भी एं वे किया ... काम नहीं है वरना यहा आप की दुवा से सब ठीक ठाक है.....आब ओ हवा देश की बहुत साफ है कायदा है कानून है इन्साफ है अल्लाह मिया जाने कोई जिये या मरे आदमी को खून वून सब मुआफ है ...छोटी मोटी चोरी रिश्वतखोरी देती है अपना गुजारा यहा... आप की दुवा से बाकी ठीक ठाक है...' विनोद खन्ना व टीम ने पड़द्यावर धम्माल केली आहे... युवकांच्या समस्या ..बेरोजगारी यावर परखड भाष्य करणारा चित्रपट म्हणून 'मेरे अपने' यशस्वी ठरला ...विनोद खन्ना ...शत्रुघ्न सिन्हा ..पेंटल.. असरानी.... दिनेश ठाकूर यांची अफलातून कामगिरी..डॅनी ने पदार्पणातच 'झलक' दाखवली होती ...' मीनाकुमारी ' संस्मरणीय....'रोज अकेली आये रोज अकेली जाये...'लतादीदींचे गाणे हृदय द्रावक....व किशोर चे एक 'अप्रतिम' गाणे ' कोई होता जिस को अपना हम अपना कह लेते यारो पास नहीं तो दूर भी होता लेकिन कोई मेरा अपना..' किशोर च्या सर्वोत्तम गाण्यापैकी एक....'गुलजार' यांनी आपल्या दीर्घ पल्ल्याच्या कारकिर्दीचा चा 'आगाज' अतिशय 'तरलतेने' केला....अविस्मरणीय.. असा.'मेरे अपने'.

## गोल्डन वर्ड्स्

### Book Review

रो.पंकज व्यवहारे



**Title: Mindset**
**Author: Carol Dweck**
**Publisher: Ballantine Books**
**Type: non fiction**
**Published in: 2007**
**Best quote in the book:**
**"It's not always the people who start out the smartest who end up the smartest"**

***Review:***

After decades of research, world-renowned Stanford University psychologist Carol S. Dweck, Ph.D., discovered a simple but groundbreaking idea: the power of mindset. In this brilliant book, she shows how success in school, work, sports, the arts, and almost every area of human endeavor can be dramatically influenced by how we think about our talents and abilities. People with a fixed mindset those who believe that abilities are fixed are less likely to flourish than those with a growth mindset those who believe that abilities can be developed. Mindset reveals how great parents, teachers, managers, and athletes can put this idea to use to foster outstanding accomplishment.

About author: Carol Susan Dweck (born October 17, 1946) is an American psychologist. She holds the Lewis and Virginia Eaton Professorship of Psychology at Stanford University. Dweck is known for her work on motivation and mindset.

# सा रे ग म सांगितिक ग्रुप

रोटरी क्लब जळगावच्या सा रे ग म या सांगितिक ग्रुपचा कार्यक्रम नुकताच दि. २९ मार्च रोजी रोटरी क्लबच्या गणपती नगर येथील सभागृहात संपन्न झाला. गेली चार वर्षे ह्या ग्रुपने उडान संस्थेच्या गतिमंद मुलांसाठी, वृद्धाश्रमातील ज्येष्ठ नागरिकांसाठी स्वातंत्र्य दिना निमित्त देशभक्तीपर गीतांचा कार्यक्रम असे अनेक कार्यक्रम सादर केले आहेत. यातील सगळे कलाकार आपल्या क्लब मधील सदस्य व त्यांचे कुटुंबिय हेच आहेत. प्रत्येक कार्यक्रम अगदी बहारदार होत असल्याने या ग्रुपचे सर्वदूर कौतुक होत असते. यात गायन वादन सादर करणारे कलाकार या प्रमाणे आहेत. गायक रो.सुबोध सराफ, रो.नित्यानंद पाटील, रो.ॲड.आनंद मुजुमदार, रो.ॲन.स्मिता पाटील, रो.ॲन.विशाखा पोतदार, रो.ॲन.किर्ती पाटील, रो.ॲन.अदिती कुलकर्णी, रो.ॲन.वृषाली जोशी, रो.ॲन.विशाखा कुलकर्णी, रो.ॲन.माधुरी जहागीरदार, रो.ॲन.पद्मा मणियार, रो.ॲन.हर्षदा भंगाळे, रो.सुरेश केसवाणी, रो.शशिकांत कुलकर्णी, रो.मुकेश महाजन, रो.विजय जोशी, रो.ॲन.मयुरा जोशी, रो.प्रविण जंगले, रो.ॲन.सोनिका मुजुमदार, रो.डॉ.काजल फिरके, रो.स्वाती ढाके, रो.ॲन.स्नेहा भुसारी, रो.अशोक जोशी, रो.डॉ.योगेन्द्र कासट, रो.ॲनेट तेजांश मजुमदार, रो.ॲनेट संभव सूर्यवंशी, रो.डॉ.दीपक पाटील (गिटार) आणि रो.कॅप्टन मोहन कुलकर्णी (बासरी). या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रो.सुबोध सराफ नेहमीच उत्कृष्टरित्या करीत असतात आणि तांत्रिक सहाय्य रो.नित्यानंद पाटील करतात. रो.उदय पोतदार त्यांच्या विनोदी आणि खास शैलीत गजल सादर करतात आणि रो.ॲड.श्रीकांत भुसारी हे त्यांच्या खास खुमासदार शैलीत बॉलीवूडचे किस्से सादर करीत असतात. पुढील कार्यक्रमास आपण सगळ्यांनी अवश्य यावे.







## यश, निवड, अभिनंदन



* रो.पंकज व्यवहारे यांची प्रॅक्टीक-अल्ट (Practic-Alt) गुरगाव या करियर काऊन्सेलिंगसाठी आणि शैक्षणिक सुविधा व माहिती पुरवण्यासाठी प्रसिद्ध असलेल्या कंपनीत Pan-India असाइनमेंटसाठी पार्टनर म्हणून निवड झाली. त्याचे मन:पूर्वक अभिनंदन!
* आपल्या क्लबच्या बॉक्स क्रिकेट टीमने रोटरी क्लब ऑफ जळगाव, इलाइट ने आयोजित केलेल्या ४५ वर्षांवरील बॉक्स क्रिकेट स्पर्धेत भाग घेतला व दोन सामने जिंकले.यात रो.चंदन महाजन यांना एका सामन्यात मॅन ऑफ द मॅच हा पुरस्कार मिळाला. हार्दिक अभिनंदन !
* रो.सुभाष अमळनेरकर व त्यांचे चिरंजीव श्री.सागर अमळनेरकर यांना अल्ट्रा टेक उत्सवामध्ये 'Outstanding Performance in Logistic Services हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्यांना सन्मान चिन्ह देऊन गौरवण्यात आले. हार्दिक अभिनंदन !
* माजी अध्यक्ष व यावर्षीचे प्रेसिडेंट एन्क्लेव चेअरमन रो.जितेंद्र ढाके आणि रो.स्वाती ढाके यांचा सुपुत्र वृषांक ढाके याने नुकतीच एमएस मटेरीअल सायन्स ही पदवी वॉशिंग्टन-(USA) येथून प्राप्त केली. त्याचे हार्दिक अभिनंदन !
* रो.नितीन काळुंखे यांनी त्यांचे वडील स्व.किशोर शंकरराव काळुंखे यांच्या स्मरणार्थ मोफत पाणपोई सुरू केली. रो.काळुंखे यांचे हार्दिक अभिनंदन.
* दि. २८ मार्च २०२६ रोजी रो.ॲन.विशाखा पोतदार यांनी त्यांचा शास्त्रीयगायन सुगम संगीतावर आधारित 'स्वरोत्सव' हा सांगितीक कार्यक्रम सादर केला. कार्यक्रम खूप छान झाला. त्यानिमित्त रो.उदय पोतदार आणि विशाखा पोतदार यांचे खूप खूप अभिनंदन.
* रो.चंदन महाजन व रो.ॲन.प्रिती महाजन यांची कन्या इशिका ही सी.ए. ची परीक्षा नुकतीच उत्तीर्ण झाली आहे. तिचे मन:पूर्वक अभिनंदन
* रो.डॉ.शशिकांत गाजरे यांची सून डॉ.हेत्वी गाजरे ही एम.डी. (सायक्रियाट्री) मध्ये एन.के.पी. मेडीकल कॉलेज व लता मंगेशकर हॉस्पीटल, नागपूर मधून सर्वप्रथम आल्याने तिला एच.जी.भावे गोल्ड मेडल प्रदान करण्यात आले. मन:पूर्वक अभिनंदन!